**अपिलेट प्राधिकरण, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन**
**यांच्यासमोरील पुर्ननिरिक्षण अर्ज**

मे.किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना,
भूईज.ता. वाई जि.सातारा, वादी

**विरुध्द**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईट, ३ रा मजला, प्रतिवादी
सायन (पूर्व) मुंबई.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे.किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना या उद्योगाची रुपये ५ लाख एवढी बॅक गॅरंटी जप्त करुन नवीन रुपये १० लाखाची बॅक गॅरंटी जमा करण्याच्या आदेशाविरुध्द जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २८ अंतर्गत केलेले अपिल.**

**प्रस्ताव-**

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या रुपये ५ लाख एवढी बॅक गॅरंटी जप्त करुन नवीन रुपये १० लाखाची बॅक गॅरंटी जमा करण्याच्या आदेशाविरुध्द मे.किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना या उद्योगाने जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २८ अंतर्गत अपिल अर्ज दाखल केला आहे. कंपनीने असे स्पष्ट केले की,मंडळाने दिलेल्या कंन्सेट आदेशातील अटीमध्ये कंपनीने सांडपाणी प्रकिया यंत्रणेमध्ये विकास/सुधारणा करावी व त्यासाठी रुपये ५ लाख एवढी बॅक गॅरंटी भरणा करावी असे नमूद आहे. व अशी सुधारणा केली नाही म्हणून मंडळाने रुपये ५ लाख एवढी बॅक गॅरंटी जप्त करुन नव्याने रुपये १० लाख एवढी बॅक गॅरंटी मागितली आहे. परंतू सध्या कार्यरत असलेल्या सांडपाणी पाणी प्रक्रिया यंत्रणेमधून बाहेर पडणा-या पाण्याची गुणवत्ता मंडळाने विहीत केलेल्या मानकांएवढी आढळते. त्यामुळे सांडपाणी प्रकिया यंत्रणेमध्ये विकास/सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.

याशिवाय मंडळामार्फत सांडपाण्याचे नमुने देखील तपासणीसाठी घेण्यात आलेले नाहीत असे कंपनीमार्फत स्पष्ट करण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ही बाब मान्य करण्यात आली.

मंडळामार्फत या प्रकरणी केवळ तांत्रिक मुद्यांवर कारवाई केल्याचे दिसून येत असून मंडळाने सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमधून बाहेर पडणा-या पाण्याची गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे. तरी मंडळाने त्याप्रमाणे कारवाई करुन तसा अहवाल, स्पष्ट अभिप्रायासहीत समितीला सादर करावा,असा निर्णय झाला.

| | | |
|---|---|---|
| अधिक्षक अभियंता | जल अभियंता | सचिव |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, | बृहन्मुंबई,महानगरपालिका मुंबई | पर्यावरण विभाग, मंत्रालय, |
| सदस्य, अपिलेट प्राधिकरण | सदस्य, अपिलेट प्राधिकरण | अध्यक्ष,अपिलेट प्राधिकरण |